# देहुरोड पोलीस स्टेशन,
# पिंपरीचिंचवड पोलीस आयुक्तालय
**पत्ता:-जुना पुणे-मुंबई हायवे, सेंट्रलचौक, देहुरोड, पुणे.**
**फोन नं.०२०-२७६७१२८८**
**ई-मेल आयडी-psdehuroad.pcpc-mh@gov.in**


**प्रेसनोट दिनांक २७/०५/२०२४**

## † महीलेचा विनंयभंग करुन फरारा झालेल्या ओला कॅब चालकास देहुरोड † पोलीसांकडुन अटक

देहुरोड पोलीस स्टेशन गु.रजि.नं. २७२/२०२४ कलम ३५४ भा.द.वि अन्वये दाखल गुन्हयातील फिर्यादी महीला यांनी दि. १४/०५/२०२४ रोजी फिर्याद दिली होती की, फिर्यादी या कोरेगाव पार्क येथे आपल्या मित्राच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाकरीता कॅब क्र. एम.एच. १४ एल.बी. ४१३३ याने जात असताना कॅब चालक राहुल पांडुरंग म्हस्के रा. थेरगाव ,पिंपरी-चिंचवड ,पुणे यांने सदरची कॅब कोरेगाव पार्क दिशेन न नेता उलट दिशेने देहुरोड पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये आणली तीने सदर महीलेच्या एकटेपणाचा फायदा उचलुन त्याचा वाहणामध्ये विनंयभंग केला. त्या नुसार सदरचा गुन्हा देहुरोड पोलीस स्टेशन येथे दाखल झाला होता.

गुन्हा दाखल झाले पासुन कॅब चालक आरोपी राहुल पांडुरंग म्हस्के रा. थेरगाव ,पिंपरी-चिंचवड, पुणे हा आपले अस्तीत्व लपवुन पुणे शहरातंर्गत वावरत होता त्याचा कोणताही प्रकारचा संपुर्ण पत्ता व माहीती नसताना देहुरोड पोलीस स्टेशनचे तपास पथकाच्या अधिकारी ,अंमलदार यांनी कौशल्यपुर्ण तपास करुन सदर आरोपीचा पत्ता शोधुन काढुन त्यास शिताफीनी पकडुन दाखल गुन्हयामध्ये अटक केली आहे तसेच गुन्हयामधील वापरती कॅब क्र. एम.एच. १४ एल.बी. ४१३३ ही सुध्दा अटक आरोपीकडुन जप्त केली आहे अधिकचा तपास देहुरोड पोलीस करत आहेत.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त सो, श्री. विनयकुमार चौबे सो, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी सो, मा. पोलीसउपायुक्त परिमंडळ–२ बापू बांगर सो, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, देहुरोड विभाग श्री. घेवारे सो. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजय वाघमारे, यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अजयकुमार राठोड, पोउपनि पी.टी खनसे, पोलीस अंमलदार प्रशांत पवार, बाळासाहेब विधाते, संतोष जाधव, सुनिल यादव, किशोर परदेशी, प्रशांत माळी, केतन कानगुडे, संतोष महाडीक, निलेश जाधव, मोहसिन आत्तार, युवराज माने, शुभम बावनकर, स्वप्नील साबळे यांनी सदरची उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

**(बापु बांगर)**
**पोलीस उप-आयुक्त,**
**परिमंडळ-२, पिंपरी-चिंचवड.**